


# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – पाचवी (17 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस सतरा :






वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ४. सावरपाडा एक्स्प्रेस : कविता राऊत



मुलगा आणि एक मुलगी असलेल्या सिंग दांपत्याने आपली दुसरी मुलगी म्हणून कविताचा सांभाळ केला. तिच्या धावण्याच्या गतीकडे विजेंद्र सिंग यांनी लक्ष पुरवले आणि त्याची प्रचिती म्हणजेच कविताचे यश. एकापाठोपाठ एक विक्रम तिच्या नावावर झळकू लागले.

कविताच्या यशामुळे हरसूल, सावरपाडा या भागास नवी ओळख मिळाली. आज केवळ राऊत कुटुंबालाच कविताचा अभिमान वाटतो असे नाही, तर संपूर्ण हरसूल परिसराची हीच भावना आहे.

नवी दिल्लीतील राष्ट्रकुल स्पर्धेत कविता जिंकल्याचे जाहीर होताच हरसूल, सावरपाडा येथे जणूकाही दिवाळीच साजरी झाली होती. स्पर्धेत विजयी झाल्यानंतर कविता आपल्या गावी येणार, म्हणून सकाळपासून जो तो स्वागताच्या कामात गुंतला होता. कविताचे कौतुक करण्यासाठी गावोगावचे लोक हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते. लेकीभोवती निर्माण झालेले वलय, तिला सत्कारासाठी घेऊन जाण्यास येणाऱ्या आलिशान गाड्या, पत्रकारांचा गराडा यामुळे आपली लेक 'लई मोठ्ठी झालीय' याचे समाधान तिच्या आईच्या डोळ्यांमध्ये सहज वाचता येत होते. कविता बंगळुरू येथे विशेष प्रशिक्षणासाठी गेली असताना रोज किमान एकदा तरी आईशी फोनवरून बोले. यावरून त्या मायलेकीचे गहिरे नाते दिसून येते.

कविता सांगते, 'आईशी बोलल्यावर मनाला वेगळंच समाधान वाटतं. दिवसभरात जे झालं, ते सर्व मी आईला सांगते. माझ्या त्रासाबद्दल मात्र तिला काही सांगत नाही, कारण ते ऐकून आईला उगीच वाईट वाटत राहतं.'

कविता हळवी आहे. प्रसिद्धीच्या वलयाने तिच्या स्वभावात काही फरक पडलेला नाही.

बापलेकीच्या नात्यातील वीणही तितकीच गहिरी. 'लहानपणी आपले बोट धरून चालणाऱ्या कविताच्या पायांमध्ये मोठेपणी इतके बळ येईल,' असे तिच्या आईवडिलांना कधी वाटलेच नव्हते. कविताच्या यशाचे सर्व श्रेय ते प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांना देतात. जेव्हा कविता प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी झगडत होती, तेव्हा तिला आर्थिक मदत मिळावी म्हणून जो जो भेटेल, त्या प्रत्येकास विनंती करण्यात विजेंद्र सिंग यांनी कोणताही कमीपणा वाटू दिला नाही. तेव्हा त्यांनी कमीपणा वाटू दिला असता, तर कदाचित आज कविता या स्थानापर्यंत पोहचू शकली नसती.

गेल्या काही वर्षांपासून कविता कुटुंबापासून दूर राहत असली, तरी तिने सर्वांचे प्रेम जपले आहे. घरचे सण-समारंभ, उत्सव यांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होता येत नसल्याची खंत कविताला वाटते. बंगळुरूच्या क्रीडा केंद्रात कविताला तिच्या आवडीच्या अजून एका गोष्टीपासून दूर राहावे लागे, ती म्हणजे वांग्याची भाजी आणि नागलीची भाकरी.

कवितामुळे सावरपाड्याचे नाव आज सर्वदूर पसरले आहे. कविता तिथल्या मुलामुलींसाठी आदर्श ठरली आहे.

आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे. पी. टी. उषा या धावपटूला ती आपला आदर्श मानते. ती खूप मेहनती आहे. धावण्याचा सराव ती मनापासून करते. आपल्या प्रशिक्षकांनी दिलेल्या छोट्या-मोठ्या सूचनांचे कटाक्षाने पालन करते. कविताचे म्हणणे आहे, 'मेहनत करणे आपल्या हातात असते. मेहनत हाच उद्दिष्टाकडे, ध्येयाकडे नेणारा महामार्ग आहे. हा महामार्ग आपल्याला यशाकडे नेतो. आपले जीवन

## 2. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

कोटीची ओळख करून घ्या.

सराव

### कोटीची ओळख

99,99,999 ही सर्वांत मोठी सात अंकी संख्या आहे. या संख्येत 1 ही संख्या मिळवली, की 1,00,00,000 ही आठ अंकी लहानांत लहान संख्या तयार होते. या संख्येचे वाचन 'एक कोटी' असे करतात. ही संख्या लिहिण्यासाठी जे नवे संख्यास्थान निर्माण केले जाते, त्याला 'कोटी' चे स्थान म्हणतात.

आठ अंकी संख्यांचे वाचन कसे करतात हे खालील उदाहरणांवरून समजून घ्या.

| संख्या | वाचन |
|---|---|
| 8,45,12,706 | आठ कोटी पंचेचाळीस लक्ष बारा हजार सातशे सहा |
| 5,61,63,589 | पाच कोटी एकसष्ट लाख त्रेसष्ट हजार पाचशे एकोणनव्वद |
| 6,09,04,034 | सहा कोटी नऊ लाख चार हजार चौतीस |

### अधिक माहितीसाठी

कोटी या स्थानाच्या डावीकडे दहा-दहा पटींनी वाढणारी; अनुक्रमे दशकोटी, अब्ज, दशअब्ज ही स्थाने आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार आपल्या देशाची लोकसंख्या 1,21,01,93,422 होती. या संख्येचे वाचन 'एक अब्ज एकवीस कोटी एक लाख त्र्याण्णव हजार चारशे बावीस' असे आहे.

एकपासून एक अब्जपर्यंतच्या दहा-दहा पटींतील संख्या.

| संख्या | वाचन | एकापुढील शून्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | एक | – |
| 10 | दहा | 1 |
| 100 | शंभर | 2 |
| 1,000 | एक हजार | 3 |
| 10,000 | दहा हजार/दशहजार | 4 |
| 1,00,000 | लक्ष/लाख | 5 |
| 10,00,000 | दशलक्ष | 6 |
| 1,00,00,000 | कोटी | 7 |
| 10,00,00,000 | दशकोटी | 8 |
| 1,00,00,00,000 | अब्ज | 9 |



## Get to know crores. Revision

**2. Number Work**

### ❒ Introducing crores

99,99,999 is the biggest seven-digit number. On adding the number 1 to it, we get the smallest eight-digit number, 1,00,00,000. We read this number as 'one crore'. The new place created to write this number is called the 'crores' place.

From the following examples, you can learn to read eight-digit numbers.

| Number | Reading |
|---|---|
| 8,45,12,706 | Eight crore forty-five lakh twelve thousand seven hundred and six |
| 5,61,63,589 | Five crore sixty-one lakh sixty-three thousand five hundred and eighty-nine |
| 6,09,04,034 | Six crore nine lakh four thousand and thirty-four |

**Something more**

On the left of the crores place are the places for ten crores, *abja,* and *ten abja* in that order. The place value of each of these is ten times the value of the one on its right. According to the Census of the year 2011, the population of our country is 1,21,01,93,422. We read this as 'one *abja* twenty-one crore one lakh ninety-three thousand four hundred and twenty-two'.

| Numbers | In words | Number of zeroes after 1 |
|---|---|---|
| 1 | One | – |
| 10 | Ten | 1 |
| 100 | Hundred | 2 |
| 1,000 | One thousand | 3 |
| 10,000 | Ten thousand | 4 |
| 1,00,000 | Lakh | 5 |
| 10,00,000 | Ten lakh | 6 |
| 1,00,00,000 | Crore | 7 |
| 10,00,00,000 | Ten crore | 8 |
| 1,00,00,00,000 | *Abja* | 9 |



Crores Ten Lakhs Lakhs Ten Thousands Thousands Hundreds Tens Units

टेस्ट सोडवा

## अर्थपूर्ण वाक्य तयार करा.




- Three race tracks are given below. Try to complete the set of sentences in each track within one minute. You have to use a new word/words in each sentence. The first one to complete a set correctly is the winner.

शर्यतीचे तीन मार्ग खाली दिले आहेत. प्रत्येक मार्गावरील संचातील वाक्ये एका मिनिटात पूर्ण करता येतात का, ते पहा. प्रत्येक वाक्यात नवीन शब्द वापरायला हवा/हवे. सर्व वाक्ये अचूकपणे पहिल्यांदा पूर्ण करणाऱ्या मुलाला/मुलीला विजेतेपद मिळेल. 03

- I am ________ .
- You are ________ .
- We are ________ .
- He is ________ .
- She is ________ .
- It is ________ .
- They are ________ .

- I like ________ .
- You like ______ .
- We like ________ .
- He likes ________ .
- She likes ________ .
- It likes ________ .
- They like ______ .

- I have ________ .
- You have ______ .
- We have ______ .
- He has ________ .
- She has ______ .
- It has ________ .
- They have ____ .


मुलांनी 'I am a boy./I am singing./I am happy.' किंवा 'It is big./It is a dog./It is raining./It is hopping.' अशी वेगवेगळ्या प्रकारची वाक्ये सांगितली, तरी ती स्वीकारावी.

पाठ वाचा व समजून घ्या.

# ३. पृथ्वी आणि जीवसृष्टी

टेस्ट सोडवा

सराव




पृथ्वीची आवरणे

**सांगा पाहू !**

(१) तुम्हांला पाणी कोठून मिळते ?

(२) तुमचे घर कोणत्या आधारावर बांधलेले आहे ?

(३) श्वासोच्छ्वास करण्यासाठी तुम्हांला कशाची गरज असते ? ही गरज तुम्ही कशी भागवता ?


(४) पृथ्वीला प्रकाश आणि उष्णता कोणापासून मिळते ?

---

पृथ्वीच्या पृष्ठभागावर काही भागांत जमीन तर काही भागांत पाणी दिसते. पृथ्वीभोवती हवेचे आवरण असते. जमिनीवर, पाण्यात आणि हवेत सजीवांचे अस्तित्व असते. पृथ्वीवरील अनेक नैसर्गिक घडामोडींना सूर्य कारणीभूत ठरतो. पृथ्वीवरील जमीन, पाणी, हवा आणि सजीव हे शिलावरण, जलावरण, वातावरण आणि जीवावरण यांचे प्रतिनिधित्व करतात. जीवावरण हे इतर तीनही आवरणांत दिसून येते.

## शिलावरण आणि जलावरण

पृथ्वीचे बाहेरील कवच कठीण आहे. ते माती व खडकांचे बनलेले आहे. आपण डोंगराळ भागातून प्रवास करताना जमिनीचे किंवा खडकांचे थर पाहतो. कोठे जमिनीचा मोठा गवताळ विस्तार दिसतो, तर कोठे ओसाड जमिनीवर वाळूच वाळू असते. कोठे जमीन पिकांनी, तर कोठे झाडांनी झाकलेली असते. काही ठिकाणी झाडांच्या मुळांनी भरलेल्या मातीचे खोलवरचे थर दिसतात, तर काही ठिकाणी झाडांच्या मुळांनी दुभंगलेले खडक दिसतात. काही ठिकाणी पर्वतांचे उतार असतात.




## २. इतिहास आणि कालसंकल्पना

टेस्ट सोडवा

पाठ वाचा व समजून घ्या.

हे आपण पाहिले आहे. एखाद्या विशेष घटनेच्या स्मरणार्थ नव्या कालगणनेची सुरुवात केली जाण्याची प्रथा पूर्वीपासून अस्तित्वात होती. उदा., एखाद्या पराक्रमी राजाच्या राज्याभिषेकाची घटना. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने इसवी सन १६७४ मध्ये 'राज्याभिषेक शक' या शकाची सुरुवात केली होती, हे आपल्याला माहीत आहे.

पृथ्वीच्या उत्पत्तीपर्यंत मागे जाणारा साडेचार अब्ज वर्षांचा एवढा मोठा काळ एकदम समजावून घेणे सोपे नाही. म्हणून तो टप्प्याटप्प्याने समजावून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी इतिहासाच्या काळाची विभागणी केली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने दोन टप्पे मानलेले




छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना (इ.स. १६३० ते १६८०)

'शालिवाहन शक' आणि 'विक्रम संवत्' या भारतात प्रचलित असलेल्या कालगणना आहेत. इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित मुहम्मद पैगंबर यांनी मक्केहून मदिनेला स्थलांतर केले. या स्थलांतराच्या काळापासून 'हिजरी' या कालगणनेची सुरुवात झाली. भारतातील पारशी समाज उपयोगात आणत असलेल्या कालगणनेच्या पद्धतीला 'शहेनशाही' कालगणना असे म्हटले जाते.

### २.३ इतिहासाची कालविभागणी

इतिहास हे भूतकाळातील घटनांचे ज्ञान करून देणारे शास्त्र आहे, हे आपण पहिल्या पाठात पाहिले. त्यावरून आपल्या हेही लक्षात येते, की होऊन गेलेला सर्व काळ हा भूतकाळ होय. भूतकाळ हाच इतिहासाचा काळ आहे. व्यापक दृष्टीने पाहता, इतिहासाचा काळ आपल्या सूर्यमालेच्या उत्पत्तीच्या काळापर्यंत मागे जातो, हे लक्षात घ्यायला हवे. सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी आपली सूर्यमाला निर्माण झाली. आपली पृथ्वी हा त्या सूर्यमालेतील एक ग्रह आहे. याचा अर्थ पृथ्वीची उत्पत्तीसुद्धा सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी झाली.

आहेत : १. प्रागैतिहासिक काळ २. ऐतिहासिक काळ.

१. प्रागैतिहासिक काळ : ज्या काळाचा इतिहास लिहिण्यासाठी लिखित पुरावा उपलब्ध होत नाही, त्या काळाला *प्रागैतिहासिक काळ* असे म्हणतात. 'प्राक्' म्हणजे पूर्वीचा.

२. ऐतिहासिक काळ : ज्या काळाचा इतिहास लिहिण्यासाठी लिखित पुरावा उपलब्ध होतो, त्या काळाला *ऐतिहासिक काळ* असे म्हणतात.

### २.४ कालमापनाच्या वैज्ञानिक पद्धती आणि कालनिश्चिती


आज कोणता वार आहे किंवा कोणती तिथी आहे किंवा कोणती तारीख आहे, हे आपण ठरवतो, तेव्हा आपण कालगणना करतो. कालगणनेच्या अनेक पद्धती असतात हे आपण पाहिले. या पद्धतींमध्ये काळाची गणना पुढील किंवा मागील क्रमाने करता येते. उदा., हा महिना जून आहे, असे म्हटले तर मागील महिना मे होता आणि पुढील महिना जुलै असेल हे सांगता येते.


● अंतर बताओ :

रियाज

टेस्ट सोडवा

## ४. कश्मीरा





❑ दोनों चित्रों को ध्यान से देखकर विद्यार्थियों से इनमें दस अंतर बताने के लिए कहें। जम्मू-कश्मीर की बेटी के संबंध में जानकारी दें।

## पहचान हमारी

❑ **अध्यापन संकेत** : पहली इकाई, पाठ ५. पहचान हमारी-भाग (१) के **पृष्ठ ८ एवं ९** में वर्णमाला का आधा भाग अध्ययन-अनुभव के लिए है। शेष वर्णमाला पाठ १३. पहचान हमारी-भाग (२) के **पृष्ठ १८ एवं १९** पर दी गई है। अध्यापन संकेत समझकर विद्यार्थियों से अभ्यास करवाएँ। संपूर्ण पाठ्‌यसामग्री का मूल उद्‌देश्य वर्णमाला के वर्णों (स्वर, व्यंजन) तथा मात्रा और उनके चिह्‌नों की पहचान करवाना है। निरंतर अभ्यास द्वारा इनका दृढ़ीकरण करवाएँ। श्रवण-वाचन का बार-बार अभ्यास एवं स्वयं अध्ययन अपेक्षित है।

(१) पृष्ठ ८, ९, १८, १९ पर स्वर ऊपर दाहिनी ओर दिए गए हैं। इनकी मात्राएँ बड़े चित्रों द्वारा पढ़ाना अपेक्षित है।

(२) सर्वप्रथम इन पृष्ठों पर दिए गए चित्रों का निरीक्षण करने के लिए कहें।

(३) बड़े चित्रों और मोटे अक्षरों के माध्यम से वर्णों का परिचय करवाएँ फिर मात्राओं को समझाएँ।

(४) पुनरावर्तन के लिए ऊपर दिए गए प्रत्येक वर्ण का क्रम बदलकर छोटे चित्रों में शब्द दिए गए हैं। ये शब्द मात्रावाले भी हैं। विद्‌यार्थियों को केवल वर्ण पहचानने और रेखांकित करने के लिए कहें।

(५) प्रत्येक पृष्ठ के नए वर्णों का परिचय करवाएँ तथा उस पृष्ठ पर आए हुए स्वर और मात्राओं को श्यामपट्‌ट पर लिखें, लिखवाएँ और आकलन कराएँ। 'पढ़ो' के लिए दिए गए शब्दों का सुलेखन और श्रुतलेखन करवाएँ।

(६) प्रत्येक पृष्ठ पर नीचे दिए गए शब्द, मात्राओं को पहचानने और दिए गए वर्णों के साथ उन्हें जोड़कर पढ़ने के लिए हैं। पहली पंक्ति बिना मात्रावाली, दूसरी पंक्ति पूर्व पृष्ठ की मात्रावाली (पृ. ८ छोड़कर) तथा तीसरी पंक्ति में उसी पृष्ठ की मात्राएँ लगाकर फिर दोनों मात्राएँ साथ लगाकर कई शब्द दिए गए हैं। इन शब्दों को श्यामपट्‌ट पर लिखकर स्वयं पढ़ें और विद्यार्थियों से अनुवाचन करवाएँ। तत्पश्चात प्रत्येक विद्यार्थी से मुखर और मौन वाचन करवाएँ। **इन शब्दों के अर्थ बताना अपेक्षित नहीं है।**

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे   वेब स्त्रोत-'ई-बालभारती'   सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in